# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे.

## जाहिर सूचना

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि. १३/११/२०२५ नूसार मतदार याद्यांच्या प्रसिध्दीच्या सुधारित कार्यक्रमानूसार दि. २०/११/२०२५ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करून त्या संदर्भात दि. २०/११/२०२५ ते दि. २७/११/२०२५ पर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

तथापि मा. राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि. २६/११/२०२५ च्या सुधारित कार्यक्रमानूसार सदर प्रारूप मतदार याद्यांवर दिनांक ०३/१२/२०२५ पर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.

| प्रभाग समिती क्रमांक | पत्ता | समाविष्ट होणारे प्रभाग |
|---|---|---|
| १ | मनपा कार्यालय, जुनी इमारत, दुसरा मजला कापआळी, भिवंडी | २,३,४,१० व ११ |
| २ | वर्धमान बिल्डिंग, टेमघर पाडा, युनियन बँक चे बाजूला, ग्राउंड फ्लोअर, साईबाबा रोड, भिवंडी. ठाणे. | ९, १२, १३, १४ व १५ |
| ३ | भि.नि.श. मनपा शाळा क्र. २३, ५९, ६७ च्या समोर असलेली नवीन इमारत, पद्मानगर, भिवंडी | १६, १७, २१, २२ व २३ |
| ४ | कै. परशराम टावरे क्रिडा संकूल लगत असलेली इमारत, तळ मजला, भिवंडी | ७, १८, १९ व २० |
| ५ | प्रभू आळी, मंडई, भिवंडी. | १, ५ , ६ व ८ |

सदर हरकती व सूचना वरील नमूद प्रभागांप्रमाणे संबंधित प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. ऑनलाईन, ई-मेल व मनपा संकेतस्थळावर आलेल्या हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार नाहीत. वरील मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

प्रारूप मतदार याद्या मनपा मुख्य निवडणूक कार्यालय, नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला, कापआळी, भिवंडी व महापालिकेचे सर्व प्रभाग कार्यालये येथे पाहणेसाठी उपलब्ध असून त्या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (https://bncmc.gov.in) डाऊनलोड करण्यासाठी व पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

ठिकाण :- भिवंडी
दिनांक :- २७/११/२०२५

(अनमोल सागर, भा.प्र.से.)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका